ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ औरंगाबाद.
**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone No.2336172**

No,CGRF/AZ/U/153/2008/74/ Date :-

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer
O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub :- Forwarding of grievance in respect of Shri Narendra Ramdas Choudharyt, Gut Noi.213, Choudhary Farm, Satara Parisar.Aurangabad.(Con. No. 490011678928).

Dear Sir

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Narendra Ramdas Choudhary, Gut No. 213, Choudhary Farm, Satara Parisar.Aurangabad.

**The consumer has requested for passing an interim order for not to disconnect his supply on account of faulty bills.**

You are requested to submit your parawise reply at the time of hearing which will be held on **25.11.2008 at 13.00 Hours**

Member Secretary
CGRF, (AZ) MSEDCL,
Aurangabad.

Encl: As above.

Copy to
Shri Narendra Ramdas Choudhary,
Gut No. 213, Choudhary Farm,
Satara Parisar.Aurangabad.

## ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१५३/२००८/७४**

**तक्रार दाखल दिनांक ;- १८/११/२००८**
**निकाल दिनांक ;- १७/०१/२००९**

**श्री नरेंद्र रामदास चौधरी,**
**गट क्रमांक २१३,चौधरी फार्म,**
**सातारा परीसर, औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११६७८९२८) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित**
**शहर मंडल औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडिया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १८/११/२००८ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. ग्राहकाचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आलेला असल्यामुळे त्यांने तो पुर्नजोडणी करून देण्याबाबत अंतरिम आदेश पारीत करण्याची विनंती मंचास केली. मंचाने अर्जदाराची विनंती मान्य करून दिनांक २५/११/२००८रोजी या प्रकरणी सुनावणी घेण्याचे ठरविले.

अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदार यांनी गट क्रमांक २१३, चौधरी फार्म, सातारा रोड औरंगाबाद येथे विहीरीवरील पंपसाठी दिनांक ०१/०१/२००५ रोजी महावितरण कंपनीकडुन वीज पुरवठा घेतला आहे. अर्जदाराने सिंगलफेज एक एच.पी.विद्युत भाराची मागणी केलेली असतांना महावितरण कंपनीतर्फे त्यांना वीज बिलात १०० कि.वॅट विद्युत भार दाखवत त्याप्रमाणे स्थिर आकार लावण्यात आले. या चुकीच्या वीज बिलाबाबत त्यांनी महावितराण कंपनीच्या छावणी उपविभागाकडे वीज बिल दुरूस्त करून देण्याबाबत विनंती केली. पण संबंधीत विभागाने ते दुरूस्त न करून देता थकीत वीज बिलापोटी त्यांचा वीज पुरवठा कायम स्वरूपी खंडीत केला.अर्जदाराने महावितरण कंपनीच्या या कृतीमुळे मंचात तक्रार दाखल केली असुन त्यांचा खंडीत केलेला विद्युत पुरवठा पुर्नजोडणी करून देण्यात यावा व सुधारीत वीज बिल, तसेच नुकसान भरपाई देण्याबाबत आदेश देण्याची विंनंती मंचास केली आहे.

२) अर्जदाराने त्याचा खंडीत केलेला वीज पुरवठा पुर्नजोडणी करून देण्याबाबत अंतरिम आदेश पारीत करावा अशी विनंती मंचास केली आहे. दिनांक २५/११/२००८ रोजी या झालेल्या सुनावणीच वेळी अर्जदार प्रतिनिधी एस.बी.मालुसरे उपस्थित होते.महावितरण कंपनीतर्फे नोडल अधिकारी श्री राठौर तसेच छावणी उपविभागाचे श्री वाघ उपस्थित होते.चुकीचा वीजभार दाखविण्यात आल्यामुळे अर्जदारास अतिरीक्त स्थिर आकार आकारण्यात

आल्याचे व ते चुकीचे असल्याचे त्यांनी मान्य केले. सी.पी.एल.चे निरिक्षण केल्यावर अर्जदारास वाढीव वीज भार दर्शवीत चुकीचे बिल आकारण्यात आल्याचे मंचास आढळुन आले. त्याप्रमाणे या चुकीच्या वीज बिलापोटी कोणतीही पुर्वसुचना न देता अर्जदाराचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आल्याचे दिसुन येते.मंचाने अर्जदाराचा खंडीत केलेला वीज पुरवठा २४ तासाच्या आत कोणतेही शुल्क न घेता पुर्नजोडणी करून देण्याचा अंतरिम आदेश महावितराण कंपनीस दिला व सुनावणीची पुढील तारीख ०५/१२/२००८ रोजी ठेवण्यात आली.

३) दिनांक ०५/१२/२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अर्जदार प्रतिनिधी व नोडल अधिकारी उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी अर्जदाराच्या सप्टेंबर २००७ पर्यत च्या वीज बिलात ३१७०९.०१/-रूपये क्रेडीट देण्याचा प्रस्ताव महावितरणच्या वरीष्ठ अधिका-यांकडे मंजुरीसाठी पाठविला असल्याचे सांगितले.मंचाने त्यांना अर्जदारास देण्यात आलेल्या अखेरच्या बिलापर्यत बिल रिव्हीजन प्रस्ताव तयार करून तो मंचात पुढील सुनावणीच्या वेळी दाखल करण्याचे सांगीतले व सुनावणीची पुढील तारीख १६/१२/२००८ रोजी ठेवण्यात आली.

४) दिनांक १६/१२/२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अर्जदार प्रतिनिधी व नोडल अधिकारी उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी बिल रिव्हीजनचा प्रस्ताव मंचात दाखल केला.मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर प्रकरण निकालासाठी ठवले.

५) दोन्ही बाजूकडून मंचात दाखल झालेल्या कागदपत्रावरून व सी.पी.एल वरून असे दिसुन येते महावितरण वीज कंपनीतर्फे अर्जदारास दिनांक ०१/०१/२००५ रोजी वीज पुरवठा देण्यात आला. अर्जदाराने १ एच.पी.(०.७४६ वॅाट) वीज भाराची मागणी केल्याप्रमाणे त्याला सिंगल फेज वीज पुरवठा देण्यात आला पण अर्जदारास देण्यात आलेल्या वीज बिलावर एकूण वीजभार १०० कि.वॅाट दर्शवीत त्यास त्याप्रमाणे स्थिरआकारची

रक्कम लावण्यात आली.जी पुर्णपणे चुकीची असल्याचे मंचाचे मत आहे.सिंगल फेज मिटरवर १०० कि.वॉट पंपाचा वीज भार जोडणे हे तांत्रीक दृष्ट्या शक्य नसल्याचे स्पष्ट पणे दिसुन येत असल्यानंतर देखील अर्जदाराने केलेली वीज बिल दुरूस्ती बाबतची तक्रारीची दखल महावितरणच्या संबंधीत विभागाने घेतली नसल्याचे दिसुन येते. व या चुकीच्या वीज बिलापोटी कोणतीही पुर्व सुचना न देता अर्जदाराचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला असल्याचे आढळुन येते. महावितरणची ही कृती वीज कायदा २००३ मधील कलम ५६ मधील तरतुदीचे उंलघन करणारी असल्याचे मंचाचे मत आहे. नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या सी.पी.एल वरून मीटर रिडींग न घेता अर्जदारास सतत लॉक, **(INACC)** (इनॲक) स्टेटस दाखवत सरासरीवर आधारीत वीज बिल आकारणी झालेली दिसुन येते.दिनांक २३/०७/२००७ रोजी करण्यात आलेल्या स्थळ पाहणी अहवालात मीटर कार्यरत असुन त्यावरील रिडींग ०२५६७ असल्याचे नमुद केल्याचे दिसुन येते त्याप्रमाणे दिनांक १४/११/२००८ रोजी वीज पुरवठा कायम स्वरूपी बंद करतांना मीटरवरील रिडींग २५९६ अशी असल्याचे दिसुन येते यावरून नवीन वीज पुरवठा केलेल्या तारखेपासुन म्हणजेच दिनांक ०१/०१/२००५ ते वीज पुरवठा खंडीत करण्यात आलेल्या तारखेपर्यत म्हणजेच १४/११/२००८ पर्यंत अर्जदाराचा एकुण वीज वापर हा (२५९६-०१)२५९५ असा असल्याचे स्पष्ट होते.

वरील सर्व बाबीचे निरीक्षण केल्यावर महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास रिडींग न घेता चुकीची बिल आकारणी,वाढीव वीजभार दाखवुन अधिक स्थिर रक्कमेची आकारणी करणे तसेच चुकीच्या वीज बिलापोटी कोणतीही पुर्व सुचना न देता अर्जदाराचा वीज पुरवठा खंडीत करणे ही महावितरण ची कृती अत्यंत बेजवाबदार असल्याचे मंचाचे मत आहे. अर्जदाराने दाखल केलेली तक्रार ही योग्य असून महावितरणच्या या सेवेतील त्रुटीमुळे तो नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे.

मंच या प्रकरणी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदारास २५९५ युनिट वीज वापराचे एकुण बिल हे ०१/०१/२००५ ते १४/११/२००८ या काळात विभागुन द्यावे.
२) महावितरण कंपनीने वरील प्रमाणे देण्यात येणा-या सुधारीत बिलात कोणतेही व्याज व दंड आकारू नये व अर्जदाराने भरलेल्या रक्कमेची वजावट या सुधारीत बिलातुन करावी.
३) महावितरण कंपनीने कोणतीही पुर्व सुचना न देता अर्जदाराचा वीज पुरवठा खंडीत केल्यामुळे व वीज कायदा २००३ मधील कलम ५६ चे उलंघन केल्यामुळे व मानसीक त्रासापोटी अर्जदारास रूपये ५००/- ३० दिवसात द्यावे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१५३/२००८/७४** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री नरेद्र रामदास चौधरी,**
**गट क्रमांक २१३,चौधरी फार्म,**
**सातारा परीसर,**
**औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१५३/२००८/७४ )

आपण दिनांक १८/११/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**